म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा
दा. क्र. २६७०

२६७०

२६७०

# उचं[illegible]

IRBK-0102610
IRBK-0102610

सौ. विजया [illegible]

वा. क्र. २६१०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. २५९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय बाल-वाङ्मय
नं.



IRBK-0102610

# वचंभट

म. ग्रं. सं. ठाणे
वा. ग्रा. २०८

लेखिका
सौ. विजयादेवी वाळिंबे

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ठाणे.
क्र. २११०

प्रकाशक
केमकर आणि मंडळी, मुंबई नं ४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

आवृत्ति पहिली ] [ सन १९४७

किंमत ४ आणे

प्रकाशक

श्रीकृष्ण दामोदर कुलकर्णी,
माधव पुरुषोत्तम कुलकर्णी.
बी. ए.
केमकर आणि मंडळी,
पब्लिशर्स, बुकसेलर्स व स्टेशनर्स,
विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई नं. ४

मुद्रक

आर. आर. बखले,
मुंबई वैभव प्रेस, गिरगांव-मुंबई नं. ४

चित्रकार

व्ही. एस्. गुर्जर

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | वचंमट | ३ |
| २ | घमेंडखोर हजाम | ५ |
| ३ | हुशार शेतकरी | ८ |
| ४ | लांडगा आला रे आला ! | १० |
| ५ | लबाड चांदोबा | १२ |
| ६ | बैल व उंदीर | १५ |
| ७ | शहाणी माशी | १७ |
| ८ | दगडूचें पोट | १९ |
| ९ | आमचे खेळ | २१ |
| १० | रमेशचा भाऊ | २२ |



बचंभट हा एक गरीब भटजी होता. बचंभट एका लहानशा घरांत राहात असे. रोज नेमानें तो सकाळीं गांवांत पंचांग सांगे. दुपारीं पुराण सांगे. पुराणानंतर थोडे तांदूळ बायका पोथीपुढें ठेवीत. ते घेऊन तो घरीं येई. बायको तांदूळ शिजवून भात करी व मग बचंभटाचें जेवण होई.

नंतर बचंभट निळूला शिकवी. निळूला लोक ' निळभंट ' अशी हाक मारीत. निळू लहान होता.

एके दिवशीं बचंभटाची बायको उसासाठीं रुसून बसली. बचंभटानें तें पाहिलें व निळूला घेऊन तो ऊस आणावयास गेला.

शेतांत खूप ऊस होते. पण ते शेतकरी लोकांचे होते. तरीपण बचंभटानें निळूला शेतांत उसांसाठीं पाठविलें. आपणांस कोणीतरी पाहील यासाठीं बचंभट बाजूला राखण बसला.

शेताचा मालक 'धुसफुस' ऐकून धांवत आला. तिकडे तो येतांच बचंभटानें एकदम निळूला कळविलें कीं—

अरे अरे निळंभटाऽ आ ।
शेंडी उडते खालीं बसा ।
धनी आला सावध असा ।
दहा तुला, दहा मला, दहा बायकोला ।
पांच पांच मुलांना ।
शेंडे बुडखे रेडकांना ।
दक्षिणेला खिंडीतून पळा ।

हें ऐकतांच शेत मालकाला वाटलें कीं भटजीबुवा आपलें 'चांगलें होवो' असें देवाला सांगत आहेत. मालक खूष झाला व पंचवीस ऊस बचंभटाला दिले.

तिकडे निळंभटानें चाळीस ऊस तोडले व दक्षिण खिडींतून मोळी घेऊन तो पळाला. बचंभट व निळंभट यांनीं ऊसच ऊस आणले.

ते पहातांच बचंभटाची बायको आनंदानें खूष झाली.

म. ग्रं. सं. ठाणे

## घमेंडखोर हजाम

बगदाद शहरांत अलीबेन नांवाचा एक फार घमेंडखोर हजाम राहात असे.

तो अतिशय हळुवार हातानें लोकांची हजामत करी. बगदादचे मोठमोठे अमीर उमराव व श्रीमान् शेटजींची अलीबेन हजामत करी. तोही यामुळें फार माजला होता. नेहमीं अलीबेन गरिबांना छळी.

बगदाद शहरीं लांकडें फार महाग होतीं. गरी ोळीवाले अलीबेनला लांकडें विकीत. पण ागर्दीच कमी किंमत देई व लुबाडी.

एके दिवशीं एक नवीन मोळीवाला आपलीं लांकडें गाढवावर घालून विकावयास आला. अलीबेननें सवदा ठरवला, सगळीं लांकडें घेतलीं आणि गाढवावर घातलेलें खोगीरही हिसकावून घेतलें. मोळीवाला पायां पडला. पण अलीबेनला दया आली नाहीं. " सगळीं लांकडें ठरलीं आहेत. तुझें लांकडाचें खोगीर आहे. मग तेंही यांत आलेंच. " शेवटीं अलीबेननें मोळीवाला घालवून दिला.

गरीब बिचारा मोळीवाला गाढव हांकीत रडत रडत चालला. कोणींही गरिबाची दाद घेतली नाहीं.

पण तिकडून खलिफा येत होता. रडणारा मोळीवाला पाहून तो कां रडतो आहे याची खलिफानें चौकशी केली. सगळी हकीकत ऐकून खलिफानें एका नोकराला पाठवून अलीबेनला बोलावलें.

*अलीबेन आला व मुजरा करून उभा राहिला.*

" हें बघ, दोघांची हजामत करावयाची आहे. काय घेशील, सांग ? " खलिफानें विचारलें.

म. ग्रं. सं. ठाणें.

" चार मोहरा " असें अलीबेननें सांगितलें.

मग खलिफानें मोळीवाला हाताला धरून आणला. अलीबेननें हजामत केली.

नंतर अलीबेनपुढें गाढव उभें केलें. आसपासचे सगळे लोक हंसूं लागले. हें पाहून अलीबेननें " गाढवाची हजामत करीत नाहीं " असें सांगितलें.

" पण दोघांची हजामत करावयाचा करार आहे. एक मोळीवाला झाला आणि दुसरें हें गाढव. " खलिफानें सांगितलें.

अलीबेन ' कां कूं ' करूं लागला.

मग खलिफानें सांगितलें, " जसें सगळीं लांकडें घेतांना खोगीरही घेतलेंस तशीच आतां दोघांचीही हजामत कर. कारण मागें लांकडांचा करार होता तसा आतां हजामतीचा आहे. "

अलीबेनची घमेंड उतरली व गाढवाची हजामत करावी लागली !

शेतांत खूप ऊस होते. पण ते शेतकरी लोकांचे होते. तरीपण बचंभटानें निळूला शेतांत उसांसाठीं पाठविलें. आपणांस कोणीतरी पाहील यासाठीं बचंभट बाजूला राखण बसला.

शेताचा मालक 'धुसफुस' ऐकून धांवत आला. तिकडे तो येतांच बचंभटानें एकदम निळूला कळविलें कीं—

अरे अरे निळंभटाऽ आ ।
शेंडी उडते खालीं बसा ।
धनी आला सावध असा ।

दहा तुला, दहा मला, दहा बायकोला ।
पांच पांच मुलांना ।
शेंडे बुडखे रेडकांना ।
दक्षिणेला खिंडीतून पळा ।

हें ऐकतांच शेत मालकाला वाटलें कीं भटजीबुवा आपलें 'चांगलें होवो' असें देवाला सांगत आहेत. मालक खूष झाला व पंचवीस ऊस बचंभटाला दिले.

तिकडे निळंभटानें चाळीस ऊस तोडले व दक्षिण खिडींतून मोळी घेऊन तो पळाला. बचंभट व निळंभट यांनीं ऊसच ऊस आणले.

ते पहातांच बचंभटाची बायको आनंदानें खूष झाली.

म. सं. सं. ठाणें

# घमेंडखोर हजाम

बगदाद शहरांत अलीबेन नांवाचा एक फार घमेंडखोर हजाम राहात असे.

तो अतिशय हळुवार हातानें लोकांची हजामत करी. बगदादचे मोठमोठे अमीर उमराव व श्रीमान् शेटजींची अलीबेन हजामत करी. तोही यामुळें फार माजला होता. नेहमीं अलीबेन गरिबांना छळी.

बगदाद शहरीं लांकडें फार महाग होतीं. गरीब मोळीवाले अलीबेनला लांकडें विकीत. पण तो अगदींच कमी किंमत देई व लुबाडी.

एके दिवशीं एक नवीन मोळीवाला आपलीं लांकडें गाढवावर घालून विकावयास आला. अलीबेननें सवदा ठरवला, सगळीं लांकडें घेतलीं आणि गाढवावर घातलेलें खोगीरही हिसकावून घेतलें. मोळीवाला पायां पडला. पण अलीबेनला दया आली नाहीं. " सगळीं लांकडें ठरलीं आहेत. तुझें लांकडाचें खोगीर आहे. मग तेंही यांत आलेंच. " शेवटीं अलीबेननें मोळीवाला घालवून दिला.

गरीब बिचारा मोळीवाला गाढव हांकीत रडत रडत चालला. कोणींही गरिबाची दाद घेतली नाहीं.

पण तिकडून खलिफा येत होता. रडणारा मोळीवाला पाहून तो कां रडतो आहे याची खलिफानें चौकशी केली. सगळी हकीकत ऐकून खलिफानें एका नोकराला पाठवून अलीबेनला बोलावलें.

अलीबेन आला व मुजरा करून उभा राहिला.

" हें बघ, दोघांची हजामत करावयाची आहे. ाय घेशील, सांग ? " खलिफानें विचारलें.

म. ग्रं. सं. ठाणे.

" चार मोहरा " असें अलीबेननें सांगितलें.

मग खलिफानें मोळीवाला हाताला धरून आणला. अलीबेननें हजामत केली.

नंतर अलीबेनपुढें गाढव उभें केलें. आसपासचे सगळे लोक हंसूं लागले. हें पाहून अलीबेननें " गाढवाची हजामत करीत नाहीं " असें सांगितलें.

" पण दोघांची हजामत करावयाचा करार आहे. एक मोळीवाला झाला आणि दुसरें हें गाढव. " खलिफानें सांगितलें.

अलीबेन ' कां कूं ' करूं लागला.

मग खलिफानें सांगितलें, " जसें सगळीं लांकडें घेतांना खोगीरही घेतलेंस तशीच आतां दोघांचीही हजामत कर. कारण मागें लांकडांचा करार होता तसा आतां हजामतीचा आहे. "

अलीबेनची घमेंड उतरली व गाढवाची हजामत करावी लागली !




एका खेडेगांवांत एक शेतकरी राहात असे.

चार मुलगे, बायको व शेतकरी असें तें कुटुंब होतें.

शेतकरी नेहमीं मेहनत करी व जमिनीची मशागत करून शेतांतून खूप पीक काढी.

लहानपणीं चारीही मुलगे खूपच उनाडपणा करीत आणि ते जरी आतां मोठे झाले तरीही तसेंच करूं लागले.

शेतांत जावयाचें, शेत नांगरावयाचें, पेरणी करावयाची, भांगलणी करावयाची, मग पीक कापावयाचें आणि घरीं आणावयाचें. अशीं कामें खरें पाहतां या मुलांनीं करावयाला हवीं होतीं.

पण हीं पोरें सारखीं उनाडत अगर आळशीपणामुळें बसून राहात.

शेतकरी दिवसेंदिवस वयातीत होऊं लागला. मुलें काम करीनात. आतां तो काळजी करूं लागला, कीं हें शेत कसें नांगरलें जावें ? शेतांत गवताचें बीं पडून गवतच फार माजूं लागलें होतें.

शेवटीं शेतकरी अगदीं अंथरुणावर पडून मरायला टेकला. सगळे मुलगे अंथरुणाजवळ जमले. मग शेतकरी हळू हळू बोलूं लागला, "हें पहा मुलांनो, मीं शेतांत एका ठिकाणीं खळगा खणून एक पैशाचें गाडगें पुरलें आहे. तें शोधून काढा व आपसांत वांटा." शेतकरी शांत बसला.

पुढें एक दोन दिवसांनीं शेतकरी मरण पावला.

लगेच मुलगे शेतांत नांगर व फावडीं घेऊन गेले. शेत भराभर नांगरूं लागले व फावडीं घेऊन खणूं लागले.

दोन महिने हें काम चाललें. पण पैशांचें गाडगें सांपडेना. मग "आतां यंदां तरी पेरूं व पीक निघालें कीं गाडगें शोधूं" असा विचार करून शेतांत बीं पेरलें.

गवत काढून जमीन खूपच तयार झालेली होती. पीक अगदीं जोरदार आलें. पीक कापून झालें. परत मुलगे गाडगें शोधूं लागले.

आतां पीक चांगलेंच येतें. कारण दरसाल मुलगे गाडगें शोधतात.

## लांडगा आला रे आला

एक धनगराचा पोर फारच वाईट होता. रोज तो गांवांत कोणाची तरी खोडी करी. लोकांना नेहमीं सतावून सोडी.

गांवांत कोणाचें व या मुलाचें सरळ पटत नसे.

लोकांची खोडी केली कीं या मुलाला आनंद होई.

डोंगरउतारावर हा मुलगा रोज मेंढरें चारी.

एके दिवशीं तो एकदम ओरडूं लागला कीं, "लांडगा आला रे आला!" आसपास शेतांत काम

करणारे लोक भराभरा पळत आले. पण खरोखर लांडगा आलाच नाहीं.

लोकांची कशी फजिती केली याचा आनंद मुलाला झाला व तो नाचूं लागला.

लोक रागावून परत गेले.

दहा पंधरा दिवस गेले. परत एके दिवशीं लोकांनीं धनगराची 'लांडगा आला रे आला!' अशी आरोळी ऐकली.

लोक सोटे घेऊन आपापलें काम सोडून धावले. पण खरोखर लांडगा आलाच नाहीं.

आतां लोक खूपच रागावले होते. ते सोटे घेऊन धावत आले होते. पण आले तसे परत गेले.

आणखी पंधरा वीस दिवस गेले.

आणि एके दिवशीं खरोखरीच एक मोठा काळा लांडगा डोंगरावरून भरदिशीं धावत आला.

एका मागून एक मेंढरें मरूं लागलीं. तें पहातांच धनगराचा पोर एकदम जोरानें ओरडूं लागला--

" लांडगा आला रे लांडगा आला ! "

पण लोकांना वाटलें, हा मुलगा वाईट आहे. खोडकर आहे. दोन वेळां आपण फसलों. आतांही मागील वेळेसारखाच हा ओरडत आहे.

कोणीही मदतीला धावलें नाहीं. लांडगा एका-मागून एक मेंढरें मारीतच होता. धनगराचा पोर ओरडतच होता—

" लांडगा आला रे लांडगा आला ! "

कोणासही फसवूं नका. फसलेले लोक मदतीला येत नाहींत.

## लबाड चांदोबा

चांदोबा फारच लबाड होता. उघडे हिंडणें चांदोबाला फारच आवडत असे.

पण एके दिवशीं आई खूपच रागावली आणि तिनें चांदोबाला बडवलें. लगेच चांदोबानें कपडे घालावयाचें ठरविलें.

आईनें कपडे शिवले.

पहिलाच दिवस होता. थोडा वेळ कपडे घातले आणि काढून टाकले. दुसरा दिवस उजाडला. पण कालचे कपडे आज आवळ होऊं लागले. दिवसा आईनें परत कपडे शिवले. दुसरा दिवस गेला. कालचे कपडे आज आवळ होऊं लागले.

चांदोबा उघडाच हिंडूं लागला.

परत आई दिवसभर बसली. कापड फाडलें. कपडे शिवले. चांदोबाला घातले. दुसरा दिवस गेला. कपडे आवळ झाले.

चांदोबा उघडाच हिंडूं लागला.

दिवसामागून दिवस चालले. रोज चांदोबा उघडा हिंडावयास निघे. रोज दिवस आई कपडे शिवी. रोज कालचे कपडे आज लहान होत आणि परत चांदोबा उघडा हिंडूं लागे.

असे पंधरा दिवस झाले. या दिवशीं तर माणसा-एवढे मोठे कपडे शिवायला लागले.

सोळा दिवस झाले. लबाड चांदोबा आतां परत बारीक होऊं लागला होता. आतां रोज कपडे मोठेच होतात असें सारखें तो आईला सांगूं लागला.


परत आई रोज दिवसा बसूं लागली. कापड फाडूं लागली व अंगाजोगते कपडे करूं लागली. तरी रोज कपडे मोठेच पडूं लागले.

असे पंधरा दिवस गेले. आई खूपच रागावली होती. रोज चांदोबा खवचटपणा करी व आई रागावे.

चार महिने असेच चालले होते. आतां कपडेच कपडे झाले. कोणताही आकार लबाडीनें घेतला तरी चांदोबाला आई कपडे घालूं लागली. कारण मोठा व लहान चांदोबा कसा होतो ही चांदोबाची लबाडी तिला कळली व तिनें तितके कपडे केले.

तरीही लबाड चांदोबा तीस दिवसांत एक दिवस कपडे न घालतांच आईला फसवून घराबाहेर पळतोच.

कारण आईला एक दिवसाचें अंगाचें मापच घेतां येईना. इतका अगदीं तो लहान झाला होता.




एकदां एका नदीकांठीं एक बैलगाडी येऊन उतरली. गाडीवानानें बैल चरावयास सोडले व गाडीवान एका झाडाखालीं भाकरी खावयास बसला. बैलाला एक कासरा बांधला होता. बैल चरत चरत लांब गेला. बैलामागें कासरा जमिनीवरून लोळत जात होता.

एका उंदरानें बैलाला पाहिलें. लोळत जाणारा कासरा पाहतांच उंदरानें विचार केला कीं, " जर मीं कासरा पकडला तर या बैलाचा मालक होईन. लोक माझी वाहवा करतील. "

असा विचार करून उंदीरमामा पुढें आले व तोंडांत कासरा धरून बैलापुढें ऐटींत चालूं लागले.

आतां मामा फारच घमेंडखोर बनले. "जगांत बैलाला घेऊन जाणारा मीच पहिला उंदीर होय." मामा मनांत सारखे घोकत होते.

चालतां चालतां मामा पुढें व बैल मागें असें करीत ते नदीपाशीं आले. नदींत कंबरेइतकें पाणी होतें.

आतां मामा थांबले पण बैल पुढें निघाला.

गुडघाभर पाणी लागलें. बैल थांबला. "चला कीं हो मालक" बैलानें सांगितलें.

"मला येतां येत नाहीं. पाणी खूप खोल आहे." मामांनीं कारण सांगितलें.

"छे हो! खोल कुठंय" आतां बैल हंसूं लागला.

"तें खरं. पण मी उंच नाहीं!" मामांनीं खालीं मान घातली.

"अहो महाराज, इतका वेळ कासरा धरून मला नेत होतात ना? मग आतां काय कठीण आहे?" बैलानें असें विचारतांच मामा ओशाळले. "होय, ती माझी चूक झाली." मामांनीं चूक कबूल केली.

"मग आतां यापुढें लक्षांत ठेवा. आपली कुवत पाहून मग बडबडत जा. नुसता घमेंडखोरपणा करीत जाऊं नका. फुकटची मिजास मिरवीत जाऊं नका." बैलानें सांगितलें.

आतां पुरीच फजिती झालेली पाहून उंदीरमामा टुणकन् उडी मारून पळून गेले.

## शहाणी माशी

एकदां एक कोळी एका झुडपाजवळ राहात असे. तो रोज नेमानें आपलें चिमुकले जाळें भराभर विणी. तोंडांतून धागा काढून आडवा उभा सरासर तो जाई. पांच मिनिटांत जाळें तयार करी व मधोमध बसे.

मग चिलटें व माशा इकडून तिकडे उडत जातांना अडकत. एकदां जाळें शिकारीला चिकटलें कीं कोळी भरकन् येई व चिलट अगर माशी 'गट्ट' करून टाकी.

रोज असा नेम चाले.

एके दिवशीं खूप भूक लागली. कोळी भराभर जाळें विणूं लागला. जाळें विणलें व तो माशांकडे पाहूं लागला. सभोंवार खूप माशा हिंडतांना दिसत.

भुकेलेला कोळी तळमळत बसला होता व आनंदी माशांकडे सारखी नजर लावून पाहात होता.

माशा पुढें, मागें, वर, खालीं, सभोंवतीं अशा फिरत.

मग माशा जरा जवळ येऊं लागून पुढें, मागें, वर, खालीं, सभोंवतीं अशाच फिरत आणि उडून जात.

कोळी एकसारखा खालीं वर माशी बरोबर फिरे.

शेवटीं एक माशी फारच जवळ आली. आतां कोळी आनंदला. कारण माशी जवळ आली. आणखी पुढें आली कीं मजा! असा विचार करून माशी बसली होती तिला चुकवून पलीकडे गेला व एक धागा टाकून कोळी परत आला.

माशी ही सगळी धडपड पाहात होती. पण तिनें लक्षच दिलें नाहीं. कोळीबुवांनीं आणखी एक धागा

टाकला आणि भराभर माशीभोंवतीं जाळें तयार करूं लागला.

'गुं गुं' आवाज करीत माशी उडाली. ती उडून जातांना कोळी 'आ' वासून पहात राहिला.

ती माशी आतां सारखी 'गुं गुं' करूं लागली व पुढें, मागें, खालीं, वर, सभोंवतीं फिरून सगळीकडे तिनें सांगितलें, "कोळी जाळें पसरून बसला आहे. येथून चला."

एकूणएक माशी हें ऐकतांच उडून गेली. इकडे कोळी चरफडत बसला.

# दगडूचें पोट

'सण वाढा हो माई' दगडू महारानें आरोळी ठोकली! आज सणाचा दिवस होता. सणाचे गोड गोड जेवणासाठीं दगडू दादासाहेबांकडे आला होता.

"वारे दगडू, आज आठवण झाली होय तुला! अलीकडे धुंदी चढलीय लेको एकेकाला आं! अरे,

तुमचे वाडवडील कधीं सण मागायला आले का नाहींत ! किती तरी क़ाम करीत ते ! झाडझुड करणें, लांकडें फोडणें, अरे, किती तरी काम करायचे ! सण तुला फुकट हवाय, काम नको करायला ! बरं पण जाऊं दे ! मी आंत जाऊन सांगून येतों कीं दगडू आलाय. तोंवर तेवढा गोठा साफ कर बघूं आधीं !" दादासाहेब असें सांगून गेले.

गरीब बिचारा दगडू !

अगदीं घाणेरडा गोठा साफ केला.

दादासाहेब परत आले!

"बरं हें बघ दगडू, आतां लांकडं संपलींत. तेवढी चार फोडून दे बघूं."

"पण साहेब, कोयती घरीं आहे. आतां कुठाय बरोबर !"

"अरे, घर लांब का आहे ! आतां धांव मारलीस तर दोन मिनिटांत पळत येशील."

कशीबशी दगडूनें कोयती पळत जाऊन आणली.

लांकडें फोडलीं तोंवर दुपारचे दोन वाजले. सारे अंग घामानें निथळत होतें. फोडलेलीं लांकडें घरांत नेऊन टाकलीं.

आणि आंत ?

एक लांकडांचा मोठा ढिगारा पडलेला दगडूनें पाहिला.

पण........

काय करतो बिचारा ?

' पोट आहे ना हें ! ' दगडू पुटपुटत होता.

*****




हीं मैदानावर खेळणारीं मुलें पहा.

तीं काय करीत आहेत ?

तीं निरनिराळे मौजेचे खेळ खेळत आहेत.

कांहींजण चेंडू खेळत आहेत. कांहींजण विटीदांडू

खेळत आहेत. कांहींजण पतंग उडवीत आहेत व कांहींजण शिवाशिविचा खेळ खेळत आहेत.

तो पहा रामा चेंडू पकडीत आहे.

अशोक विटी कोलीत आहे.

शशि व गंपू शिवाशिवी खेळत आहेत.

सुमन दोरीवरून उडी ठोकीत आहे.

रोज सायंकाळीं शाळेजवळील मैदानावर मुलें निरनिराळे खेळ खेळतात. मीही खूप खेळतों. शाळेंतील धडे संपून घरीं येतांच मुलांनीं खूप खेळावें. खेळतांना भांडण तंटा व मारामारी करूं नये. एकमेकांना बोचकारूं नये. ओरडूं नये. शिवी देऊं नये. एकमेकांनीं बिन भांडतांना आनंदानें खेळावें.

## रमेशचा भाऊ

रमेश अगदीं घाणेरडा मुलगा होता. तो तोंड धूत नसे. कपडे धुवावयाला देत नसे. आपलीं खेळणीं नीट ठेवीत नसे.

एके दिवशीं एक छोटा देवदूत रमेशाकडे आला. देवदूतानें रमेशाचें बोट पकडलें व घराबाहेर आणलें.

" अरे, कोठें नेतोस मला ? " रमेश घाबरला.

" कोठें नाहीं. तुझा भाऊ राहातो तेथें चल. " देवदूतानें सांगितलें. " तूं नीट राहात नाहींस. घाणेरडा आहेस. "

" माझा भाऊ घराबाहेर राहात नाहीं. " रमेश कुरकुरूं लागला.

" अरे होय रे. बाहेरच राहातो. तूं चल गपचूप." देवदूतानें सांगितलें.

रमेश व देवदूत घराबाहेर जाऊन उभे राहिले. मग देवदूत बोलला, " आतां तुझा भाऊ येईल. " देवदूत एकदम निघून गेला.

तिकडून एक वासरूं पळत आलें. रमेशला वाटलें, हाच माझा भाऊ.

पण वासरूं बोललें, " मी नाहीं तुझा भाऊ. मी किती छान आहें ! तूं बघ कसा घाणेरडा आहेस ?" वासरूं उडी मारून निघून गेलें.

जरा वेळानें एक चिमणी आली. रमेशला वाटलें, आपला भाऊ आला. चिमणी बोलली, " चल हो

दूर. माझे पंख बघ किती छान आहेत! घाणेरडा कुठला!" चिमणी उडून गेली.

थोडा वेळ गेला. टप् टप् टप् पावलें वाजूं लागलीं. रमेशला कोणी तरी हांक मारली. "अरे भाऊ, इकडे ये. मी तुझा भाऊ तुला भेटायला आलों आहें." एक गाढव तिकडून आलें.

रमेश जोरानें ओरडला, "तूं माझा भाऊ नाहींस."

"होयच मुळीं." गाढव बोललें, "मी आंघोळ करीत नाहीं; तूंही करीत नाहींस. मी घाणींत लोळतों, तूंही लोळतोस. मी लाथा मारतों, तूं मारामारी करतोस, चावतोस. मग मी तुझा भाऊ आहें कीं नाहीं?" गाढव रमेशजवळ येऊं लागलें. रमेश एकदम पळाला.

तो घरांत गेला. अगोदर दांत घासले. कपडे धुवायला टाकले. खेळणीं नीट जागेवर ठेवलीं. घाणेरडेपणा टाकून दिला. आतां रमेशला देवदूतानें दाखविलेला 'भाऊ' भेटत नाहीं.



IRBK-0102610

म. ग्रं.

# लहान मुलांकरितां सुंदर पुस्तकें

ले. सौ. विजयादेवी वाळिंबे — आणे

| | |
|---|---|
| गौरीशंकर | ४ |
| वळवाचा पाऊस | ४ |
| बचंभट | ४ |
| उंटावरला शहाणा | ४ |

ले. ना. गं. लिमये, बी. ए., एल्. टी.

| | |
|---|---|
| सचित्र बालकथा | ५ |
| शिशुकथा | ४ |
| एकवीस गोष्टी | ६ |
| नीतिकुंज | ८ |
| बालगीत भाग १ ला | ५ |
| „ भाग २ रा | ७ |

ले. वि. कृ. नेरुरकर, बी. ए., एस्. टी. सी.

| | |
|---|---|
| माणूस आणि पशु | ६ |

ले.—शकुंतला लिमये

| | |
|---|---|
| तशी काय झालं ? | ४ |
| मग किनई | ६ |

ले.—बाळ ओझरकर

| | |
|---|---|
| चंद्रमोहन व इतर गोष्टी | ४ |

ले. सुभाष सुखटणकर

| | |
|---|---|
| ओटीवरील गोष्टी | ४ |

ले—तु. ता. सावंत एस्. टी. सी.

| | |
|---|---|
| हसले ते फसले | ४ |
| प्रसाद | ४ |

ले. य. वि. ठोसर एम्. एस्सी.

वीरबाला व इतर गोष्टी

ले.—शं. वि. तानवडे

पृथ्वी नि माणूस

हिंदु. इति. मनोहर गोष्टी

ले.—वसंत केमकर

नलूच्या गोष्टी

ले.—शशिनाथ

नंदापरी

ले.—बा. अ. देसाई

चांदा गोऱ्हा

ले. रा. दि. देसाई

तिसरी भाकरी

ले. रामतनय

वाळू नि बगडी भाग १ ला

## प्रौढ मुलांसाठीं

ले.—के. ग. अलूरकर, एम्. ए.

| | |
|---|---|
| अग्रपूजा व इतर गोष्टी | १ |
| दिव्य विहंग | १ |

ले.—रामतनय

| | |
|---|---|
| कॅप्टन प्रताप भाग १ ला | १ |

ले.—प्रो. वि. स. गोगटे, एम्. ए.

| | |
|---|---|
| काय म्हणतां ? | ६ |

कवयित्री—काशीताई नाटेकर

गवाक्षगीत

आपुलकी

## केमकर आणि मंडळी,

पब्लिशर्स, बुकसेलर्स व स्टेशनर्स, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई नं. ४

ग्रँटरोड ब्रँच—पन्नालाल टेरेसेस, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७